**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

# दैनिक आकर्षण




संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक २१० । गुरुवार १४ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

अहिल्यानगर महापालिकेच्या

## पाणी व भुयारी गटार योजनेसाठी १ हजार कोटींच्या कर्जाचा आरोप तथ्यहीन

**महानगरपालिकेला केवळ २५ टक्के स्वहिस्सा उभारावा लागणार**
**दोन्हीपैकी एकच योजना विचाराधीन – आयुक्त यशवंत डांगे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरासाठी प्रस्तावित असलेल्या नवीन पाणीपुरवठा आणि भुयारी गटार (टप्पा २) योजनेसाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य घेण्याच्या प्रस्तावावरून महानगरपालिका एक हजार कोटींचे कर्ज काढून नगरकरांवर करवाढीचा बोजा लादणार असल्याचे आरोप चुकीचे व तथ्यहीन आहेत. दोन्ही योजनांपैकी एकच योजना विचाराधीन असून महानगरपालिकेला केवळ २५ टक्के रक्कम स्वहिसा म्हणून उभारावी लागणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

अहिल्यानगर महापालिकेकडून पाणी योजनेसाठी आणि भुयारी गटार योजनेसाठी स्वहिस्सा उभारण्यासाठी प्रस्ताव केले आहेत. नगर विकास विभागाच्या महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजनेअंतर्गत जागतिक बँकेच्या साहाय्याने निधी उभारणीसाठी महापालिकेने प्रस्ताव पाठवले होते. राज्य शासनाच्या निर्देशानुसार सदर प्रकल्पांसाठी निधी उभारण्याचे प्रस्तावित आहे.

राज्य शासन जागतिक बँकेकडून कर्ज घेणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना ती रक्कम अनुदान स्वरूपात दिली जाणार आहे. या रकमेवर महापालिकेला एक रुपयाचेही व्याज द्यावे लागणार नाही किंवा कोणतीही मालमत्ता तारण ठेवावी लागणार नाही. योजनेच्या एकूण खर्चापैकी ५० टक्के रक्कम सहायक अनुदान म्हणून शासनाकडून उपलब्ध होईल. तसेच, २५ टक्के रक्कम अर्बन चॅलेंज फंडमधून किंवा राज्य अनुदानातून मिळेल. त्यामुळे महापालिकेला केवळ २५ टक्के हिस्साच उपलब्ध करायचा आहे. शासनाच्या नगरोत्थान आणि अमृत योजनेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा ३० टक्के असतो, त्या तुलनेत या नव्या योजनेत महापालिकेला ५ टक्के कमी हिस्सा भरावा लागणार आहे. सध्या नगरोत्थान आणि अमृत योजनेमध्ये निधी उपलब्ध नसल्याने या योजनेचा पर्याय निवडला आहे, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

सध्या महापालिकेच्या पाणीपुरवठा आणि भुयारी गटार या दोन योजनांपैकी केवळ एकाच योजनेवर विचार सुरू आहे. जागतिक बँकेकडून सध्या केवळ प्राथमिक आर्थिक आणि तांत्रिक तपासणी केली जात आहे. त्यामुळे १००० कोटी रुपयांचे कर्ज काढण्याचा आणि ते फेडण्यासाठी करवाढीचा आरोप तथ्यहीन असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

मनपा आयुक्तांनी मुख्यमंत्र्यांना

## खोटे ठरवणारी माहिती जाहीर केली आहे ती देवाभाऊंना मान्य आहे का?

**ठाकरे शिवसेना महानगर प्रमुख काळेंचा सवाल । पाणी पुरवठ्याच्या केडगाव, फेज टू, अमृत योजनेच्या ऑडिटसह सखोल चौकशीची सरकारकडे ठाकरे शिवसेना मागणी करणार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मनपा निवडणूक प्रचार सभे वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती की, आम्हाला सत्ता द्या. महापालिकेत महापौर विराजमान झाल्यानंतर एक महिन्यात अमृत सुधारित पाणीपुरवठा योजनेच्या ४९२ कोटी रुपयांच्या प्रस्तावां सह रस्त्यांच्या ३५० कोटींच्या कामांना मंजुरी देऊ. ६ फेब्रुवारीला भाजप-राष्ट्रवादीच्या युतीतून महापौर निवड झाली. त्यालाही तीन महिने उलटून गेले. तरी सरकारने अहिल्यानगरकरांना रुपया दिला नाही. सध्या नगरोत्थान आणि अमृत योजनेमध्ये निधी उपलब्ध नसल्याची माहिती मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रसार माध्यमांद्वारे देऊन मुख्यमंत्री देवाभाऊंनाच खोट ठरवल आहे. आयुक्तांनी मुख्यमंत्र्यांच्या खोटारडेपणाचा केलेला भांडाफोड देवाभाऊंना मान्य आहे का ?, असा बोचरा सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

मंगळवारी ठाकरे शिवसेनेने मनपा प्रशासन, सत्ताधाऱ्यांवर पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनेसाठी १००० कोटी रुपयांचे कर्ज काढून नगरकरांना कर्जाच्या खाईत लोटले जात असल्याचा आरोप केला होता. चोवीस तास उलटत नाहीत तोच त्यावर मनपा आयुक्त डांगे यांनी प्रसारमाध्यमांद्वारे खुलासा केला. ठाकरे शिवसेनेने केलेले आरोप आयुक्तांनी फेटाळले. नगर विकास विभागाच्या महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजने अंतर्गत जागतिक बँकेच्या साहाय्याने निधी उभारणीसाठी महापालिकेने प्रस्ताव पाठवला आहे. सध्या नगरोत्थान आणि अमृत योजनेमध्ये निधी उपलब्ध नसल्याने हा पर्याय निवडल्याची माहिती आयुक्त डांगे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री एका महिन्यात मंजुरी देतो म्हणतात. तर आयुक्त योजनेसाठी पैसे नाही म्हणतात, या दुतोंडीपणाकडे लक्ष वेधत किरण काळे यांनी जोरदार निशाणा साधला आहे.



**विकासाला साथ, भ्रष्टाचाराला विरोध :**
मुख्यमंत्र्यांची घोषणा कशी खोटी होती हेच आता आयुक्तांनी सांगितले आहे. खोट्या आश्वासनानंतर सत्ताधाऱ्यांना पाशवी बहुमत मिळाल्या वर आता मात्र नगरकरांच्या हाती त्यांनी मोठा भोपळा ठेवला असल्याचा आरोप किरण काळेंनी केला आहे. विकास कामांना आमची साथ असेल. पण नियोजनशून्य कारभार, भ्रष्टाचार, गैरव्यवहाराला ठाकरे शिवसेनेचा तीव्र विरोध असेल, असे काळेंनी स्पष्ट केले आहे.

**ऑडिटसह चौकशीची मागणी करणार :**
केडगाव पाणी योजना, २०१० ची ११० कोटींची फेज टू, २०१६ ची १३४ कोटींची अमृत पाणी योजना या माध्यमातून आजपर्यंत २५० कोटी रुपये खर्च केले. पण त्याचं पाणी नळातून आलं नाही. मग हे पाणी नेमकं जिरलं कुठं ? कोणी कोणी ते जिरवलं ? ते जिरवून ढेकर देऊन भागल नाही म्हणून पाणी पट्टीमध्ये यावर्षीपासून दरवाढ लागू केली का ? हे ठाकरे शिवसेना खपवून घेणार नाही. आधी अडीचशे कोटींचा हिशोब द्यावा लागेल. त्याशिवाय ४९५ कोटी रुपयांचं कर्ज काढण्याचा त्यांना अधिकार नाही. भ्रष्टाचाराला खतपाणी घालू दिल जाणार नाही. लवकरच अडीचशे कोटींच्या कामांच्या ऑडिट्सह सखोल चौकशीची मागणी राज्य शासनाकडे ठाकरे शिवसेना करेल, असे किरण काळे यांनी जाहीर केले आहे.

**आयुक्त दिशाभूल करत आहेत :**


■ पान ४ वर

## पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या संदेशाला पालकमंत्र्यांचा प्रतिसाद

### डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासकीय ताफ्यात केली मोठी कपात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशभरात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि अनावश्यक शासकीय खर्च कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशाची व्यापक चर्चा सुरू असतानाच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याला प्रतिसाद दिला आहे.



शासकीय ताफ्यातील अनावश्यक वाहनांची संख्या कमी करत त्यांनी आता आपल्या ताफ्यात केवळ दोनच वाहने ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, सामान्य जनतेतूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी स्वतः पासून काटकसरीची सुरुवात करावी, असा संदेश या निर्णयातून दिला जात असल्याचे बोलले जात आहे. सध्या देशभरात इंधन वापर कमी करणे, पर्यावरण संवर्धन आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत मोठे ताफे, अतिरिक्त वाहनांचा वापर आणि वाढता शासकीय खर्च यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. त्याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

विशेष म्हणजे, अनेकदा राजकीय पदाधिकाऱ्यांचे मोठे ताफे, त्यासाठी लागणारा इंधन खर्च आणि प्रशासनावर येणारा अतिरिक्त भार याबाबत सामान्य नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असते. मात्र विखे पाटील यांनी स्वतःहून पुढाकार घेत ताफ्यात कपात केल्याने साधेपणा आणि जबाबदारीचे उदाहरण समोर आले आहे.

पर्यावरणपूरक जीवनशैली, इंधन बचत आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर या तिन्ही गोष्टींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेला फक्त संदेश देऊन चालत नाही, तर स्वतः कृतीतून आदर्श निर्माण करणेही गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राज्यातील इतर लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणांनीही अशा प्रकारे खर्चात बचत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. इंधन बचतीसह पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा हा निर्णय सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

## नगर–कल्याण महामार्ग ठप्प होणार!

**आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गावांमध्ये बैठका । कांदा उत्पादकांच्या मागण्यांसाठी रवींद्र राजदेव मैदानात । हजारो शेतकरी ट्रॅक्टरसह रस्त्यावर उतरणार । टाकळी ढोकेश्वर परिसरात आंदोलनाची जय्यत तयारी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली १५ मे रोजी नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गटाचे खंबीर नेते आणि नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन छेडले जाणार असून, यामुळे जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर परिसरातील गावांमध्ये रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या बैठका होत आहेत व या बैठकांच्या माध्यमातून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे.

सध्या बाजारात कांद्याला मिळणारा भाव अत्यंत कमी असून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कांद्याला योग्य हमीभाव मिळावा, निर्यातबंदी कायमस्वरूपी हटवावी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, शेतीपंपांचे वीज बिल माफ करावे आणि पीकविम्याची रक्कम तातडीने मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. रवींद्र राजदेव यांनी या आंदोलनाबाबत माहिती देताना सांगितले की, शेतकरी सध्या आर्थिक संकटात असून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या बेतात आहेत. जर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही, तर हे आंदोलन अधिक उग्र रूप धारण करेल.

रवींद्र राजाराम राजदेव हे पारनेर तालुक्यातील एक सक्रिय सामाजिक आणि राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. जनसेवक अशी प्रतिमा असलेल्या राजदेव यांनी यापूर्वीही रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या प्रश्नांवर यशस्वी लढे दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संलग्न असलेले राजदेव हे निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत असून, त्यांना सोनियाताई राजदेव यांची ग्रामीण विकासाच्या

■ पान ४ वर

### आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गावागावांमध्ये बैठका..

**टाकळी ढोकेश्वर परिसरातील पिंपळगाव रोठा, वडगाव सावताळ, सावरगाव, नांदूर पठार, काटाळवेढा, पळसपुर म्हसोबा झाप, पोखरी, खडकवाडी, देसवडे या भागात नगर कल्याण महामार्गावर कांदा प्रश्नी रस्ता रोको रवींद्र राजदेव यांचे नेतृत्वाखाली करण्यात येणारे आंदोलनाची जय्यत तयारी सुरू असून प्रत्येक गावात ठिकाणी बैठका घेऊन आंदोलनाची तयारी करण्यात येत आहे मोठ्या संख्येने हजारो शेतकरी ट्रॅक्टर बैलगाडी सह रस्त्यावर उतरणार आहेत.**

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**धर्मवीर संभाजी महाराजांचे शौर्य व स्वाभिमान प्रेरणादायी – संपत बारस्कर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी संभाजी महाराजांच्या जीवनकार्याची उजळणी करत त्यांचे शौर्य, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठा अधोरेखित केली. ते म्हणाले की, ''छत्रपती संभाजी महाराजांनी अवघ्या ९ वर्षांच्या कार्यकाळात १२० हून अधिक लढाया लढल्या आणि एकही युद्ध न हरता मोगल सत्तेला रोखून धरले. त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व आणि धर्मनिष्ठेमुळे त्यांना 'धर्मवीर' म्हणून ओळखले जाते.



ते पुढे म्हणाले की, ''संभाजी महाराजांनी कोणत्याही परिस्थितीत स्वाभिमान आणि धर्मनिष्ठेशी तडजोड केली नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर त्यांनी स्वराज्याचे रक्षण करत शत्रूंचा मुकाबला केला. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती सुधारणा यावर त्यांनी विशेष भर दिला होता.

या कार्यक्रमास दीपक खेडकर, सचिन जगताप, बाळासाहेब निकम, योगेश एरंडे, गिरीश जगताप आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एसआयआर योजनेचा तिसरा टप्पा महाराष्ट्रासह सोळा राज्यांत होणार सुरू

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था –** भारत निवडणूक आयोगाने एसआयआरचा तिसरा टप्पा जारी केला आहे. या तिसऱ्या टप्प्यात १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा देखील समावेश आहे. महाराष्ट्रात एसआयआरची प्रक्रिया २० जूनपासून सुरु होईल ती प्रक्रिया ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर पूर्ण होणार आहे. एसआयआरचा तिसरा टप्पा २० मे पासून सुरु होईल आणि तिसरा टप्पा २३ डिसेंबरल २०२६ ला संपणार आहे.

आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये एसआयआर होणार आहे. नवी दिल्ली, चंदीगड आणि दादरा नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगानं एसआयआर प्रक्रिया मतदार यादी अचूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. भारत निवडणूक आयोगानं यासाठी सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक बूथसाठी बीएलएची नियुक्ती करण्याचं आवाहन केले आहे. भारत निवडणूक आयोगानं यापूर्वी दोन टप्प्यात १३ राज्ये आणि केंद्रशासित

■ पान ४ वर

## 'नीट'बाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

**मुंबई । वृत्तसंस्था –** पेपरफुटी प्रकरणानंतर एनटीएने (National Testing Agency) RE-NEET घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांना नव्याने अर्ज भरण्याची गरज नसल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, परीक्षा शुल्क परत करण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र हा परतावा नेमका विद्यार्थ्यांच्या खात्यात होणार की नेट कॅफे किंवा सेतू केंद्र चालकांच्या खात्यात, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

NEET साठी सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १७०० रुपये तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १००० रुपये शुल्क आकारण्यात आले होते. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी अर्ज नेट कॅफे आणि सेतू केंद्रांच्या माध्यमातून भरल्याने ऑनलाइन व्यवहार संबंधित चालकांच्या खात्यांतून झाले होते, तर विद्यार्थ्यांनी त्यांना रोख रक्कम दिली होती.

NTA कडून फी परताव्याची घोषणा झाल्यानंतर सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण झाला आहे की, रिफंड मूळ व्यवहार ज्या खात्यातून झाला त्याच खात्यात जमा होणार का? तसे झाल्यास अनेक विद्यार्थ्यांचे पैसे थेट नेट कॅफे चालकांच्या खात्यात जाण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांनी स्वतःचे किंवा पालकांचे बँक तपशील अद्ययावत ठेवावेत, तसेच फी थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी स्पष्ट आणि पारदर्शक यंत्रणा तयार करण्याची मागणी तज्ज्ञांनी केली आहे.

## दै. आकर्षण निवडक

### झोपडपट्टीतील मुलांसाठी 'संगणक साक्षर रथ' उभारण्याची मागणी



अहिल्यानगर- झोपडपट्टी भागातील तसेच कचरा वेचक, हातमजूर आणि वंचित घटकातील मुलांना आधुनिक डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ''संगणक साक्षर रथ'' हा अभिनव फिरता संगणक शिक्षण प्रकल्प राबविण्याचा मानस कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आर्थिक तसेच प्रशासकीय सहकार्य मिळावे, अशी मागणी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अहिल्यानगर शहरात सुमारे २२ झोपडपट्ट्या असून शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी तब्बल ५० % अधिक लोकसंख्या झोपडपट्टी भागात वास्तव्यास असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या वस्त्यांमध्ये कचरा गोळा करणारे कामगार, बांधकाम मजूर, हातमजुरी करणारे, स्थलांतरित कामगार तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणात राहतात. अशा परिस्थितीत या कुटुंबांतील मुलांना दर्जेदार शिक्षणासोबत डिजिटल सुविधा उपलब्ध होत नसल्याने ते आधुनिक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहत आहेत.आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (), इंटरनेट आणि ऑनलाईन शिक्षणाच्या युगात संगणक ज्ञान अत्यावश्यक बनले आहे. शासनाच्या विविध योजना, शिष्यवृत्ती, रोजगाराच्या संधी आणि अनेक शासकीय सेवा डिजिटल माध्यमावर आधारित झाल्या आहेत. मात्र, गरीब आणि वंचित समाजातील मुलांना संगणक, इंटरनेट व डिजिटल साधनांचा परिचय नसल्यामुळे त्यांना या सुविधांचा लाभ घेणे कठीण होत आहे. यामुळे डिजिटल दरी अधिक वाढत असल्याची चिंता संघटनेने व्यक्त केली आहे.या पार्श्वभूमीवर ''संगणक साक्षर रथ'' हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, एका मोठ्या बसचे रूपांतर संगणक प्रयोगशाळेमध्ये करण्यात येणार आहे. ही बस शहरातील झोपडपट्ट्या, कचरा वेचक वस्त्या, मजूर वस्ती आणि इतर वंचित भागांमध्ये फिरून मुलांना मोफत डिजिटल शिक्षण देणार आहे. या रथामध्ये १० ते १५ संगणक, इंटरनेट सुविधा, प्रोजेक्टर, डिजिटल शिक्षण साहित्य तसेच प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांना संगणकाचे प्राथमिक ज्ञान, इंटरनेट वापर, ऑनलाईन शिक्षण, ई-मेल तयार करणे, ऑनलाईन फॉर्म भरणे, मराठी व इंग्रजी टायपिंग, डिजिटल व्यवहार, सायबर सुरक्षा तसेच कौशल्य विकासाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे.

### बेकायदेशीर उद्योगांविरोधात आमरण उपोषणी

अहिल्यानगर- एमआयडीसी परिसरातील मे. शितल इंडस्ट्रीज (प्लॉट क्र. -३७) आणि एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड (नवनागापूर) यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप समोर आले असून संबंधित उद्योगांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी कामगार व सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. माहितीनुसार, शितल इंडस्ट्रीज ही प्लास्टिक मोल्डिंग करणारी फॅक्टरी गेल्या दोन ते तीन वर्षांपासून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक व परवानगी न घेता सुरू असल्याचा आरोप आहे. तसेच २०१६, २०१६ आणि १९७४ यांसारख्या महत्त्वाच्या पर्यावरणीय कायद्यांचे उल्लंघन केल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.याशिवाय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाकडील यांसारख्या परवानग्याही न घेता कारखाना सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे कामगारांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.कामगारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित उद्योगांमध्ये (शिसे) संबंधित काम होत असून अनेक कामगारांच्या रक्तामध्ये लीडचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, नियमित वैद्यकीय तपासणी केली जात नसून काही अधिकारी तपासणी टाळत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. कामगारांना हातपाय सूजणे, पोटदुखी यांसारख्या तक्रारी असूनही योग्य उपचार व सहकार्य मिळत नसल्याचा आरोप आहे.

# ससेवाडीच्या जंगलात वन्यजीवांसाठी 'जीवनदायी' पाणवठा भरला

**अतितीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जाणीव फाऊंडेशनचा संवेदनशील उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात यंदाच्या तीव्र उन्हाळ्याने नागरिकांचे जगणे कठीण केले आहे. प्रचंड उष्णतेमुळे सर्व सुविधा उपलब्ध असूनही नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दर काही वेळाने पाणी पिण्याची गरज भासत असताना जंगलातील वन्य पशु-पक्ष्यांची अवस्था किती भीषण होत असेल, याची कल्पनाच न केलेली बरी. अनेक ठिकाणी पाणवठे आटल्याने वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून काही प्राणी-पक्षी तहानेने जीव गमावत आहेत.

याच संवेदनशीलतेतून जाणीव फाऊंडेशन, सावेडीच्या सदस्यांनी वन्यजीवांसाठी 'जीवनदायी' उपक्रम हाती घेतला. ससेवाडी (जेऊर) परिसरातील जंगलामध्ये असलेला तब्बल ५५०० लिटर क्षमतेचा पाणवठा पूर्ण क्षमतेने भरून वन्य जीवांना दिलासा देण्याचे काम करण्यात आले. ही मोहीम आज सकाळी ७ वाजता उत्साहात पार पडली.

या उपक्रमात जाणीव फाऊंडेशनचे सदस्य ॲड. विक्रम वाडेकर विश्वस्त मोहटादेवी देवस्थान, प्रदीप वाखुरे, विकास जोशी, सोहा जोशी तसेच ॲड. व इंजिनिअर कैलाश दिघे यांनी विद्याधर पेटकर, मारुती पादीर आणि राघवेंद्र पेटकर यांच्या सहकार्याने सक्रिय सहभाग नोंदविला.

उन्हामुळे तहानलेल्या वन्य प्राणी आणि पक्ष्यांसाठी हा पाणवठा मोठा आधार ठरणार असून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम प्रेरणादायी मानला जात आहे. जाणीव फाऊंडेशनच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, ''प्राणी-पक्ष्यांविषयी प्रेम आणि संवेदनशीलता जपत प्रत्येकाने आपल्या घराजवळ, गच्चीत, अंगणात किंवा परिसरात पाण्याचे भांडे भरून ठेवावे. उन्हाच्या तीव्रतेत तहानलेल्या पशू-पक्ष्यांसाठी हा छोटासा प्रयत्नही मोठे जीवदान ठरू शकतो. तसेच चांगला पाऊस पडेपर्यंत जंगलातील व परिसरातील पाणवठे नियमित भरून ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.''

# नर्स म्हणजे हॉस्पिटलचा कणा – आ. अक्षय कर्डीले

**साईदीप सहयाद्री हॉस्पिटलमध्ये नर्सेस दिन उत्सात साजरा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** प्रत्येक रुग्णाची संपूर्ण काळजी घेणाऱ्या नर्सेस या हॉस्पिटलचा कणा असतात अहोरात्र न थकता रुग्णांना त्या सेवा देत असतात जसे डॉक्टर्स च्या मार्गदर्शनाखाली उपचार पद्धतीचे योग्य मूल्यमापन करून रुग्णांना सेवा देतात यामुळे हॉस्पिटल रुग्णांच्या विश्वासास पात्र ठरते यामुळे आपलवाधित साईदीपसहयाद्री हॉस्पिटल ने रुग्णांचा विश्वास संपादन केला आहे असे गौरवउदगार आ अक्षय कर्डीले ने व्यक्त केले.

साईदीप सहयाद्री हॉस्पिटल मध्ये नर्ससेस दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे द्विप प्रज्वलन आ अक्षय कर्डीले यांच्या हस्ते झाले यावेळी हॉस्पिटल चे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ दीपक एस एस, डॉ रवींद्र सोमाणी, डॉ शामसुंदर केकडे, डॉ निसार शेख, डॉ किरण दीपक, डॉ वैशाली किरण, डॉ अनिकेत कुऱ्हाडे, व इतर डॉक्टर्स व नर्से स मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ अक्षय कर्डीले यांनी मी लहान असताना डॉ दीपक यांच्या दीपक हॉस्पिटलला वडिलांन सोबत जात होतो तेव्हा पासून मी डॉक्टर दीपक सर यांना अत्यंत जवळून पहिले आहे त्यांची वैद्यकीय सेवेतील दूर दृष्टीमुळे नगर मध्ये साईदीपसहयाद्री हे भव्य हॉस्पिटल आज रुग्णांच्या गळ्याचे ताईत बनले आहे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा व उपचार एकाच छताखाली उपलब्ध असल्याने रुग्णांना इतर महानगरात जाण्याची गरज पडत नाही असे ते म्हणाले प्रास्ताविक करताना डॉ दीपक यांनी साईदीपसहयाद्री हॉस्पिटल च्या निर्मिती पासून अनेक मुद्दे उपस्थित करून स्व शिवाजीराव कर्डीले साहेब यांची वेळोवेळी कशी साथ मिळाली ते नमूद केले लवकरच कॅन्सर रेडियशन युनिट सुरु होणार असून त्याचे काम प्रगती पथावर आहे हे सांगून नर्सेस ची मोलाची साथ आणि अहोरात्र सेवा यामुळे साईदीप सहयाद्री हॉस्पिटल अपवाधित नावारूपास आले असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ तेजल गर्जे यांनी केले व आभार व्यवस्थापक डॉ व्यंकटेश मुळे यांनी केले कार्यक्रमास सर्व डॉक्टर्स, नर्सेस, ब्रदर, नर्सिंग विभाग प्रमुख संतोष सांगळे, व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये 'एकेएसएन इन्फोटेक' ची दुसरी शाखा सुरू; आयटी क्षेत्रात स्थानिकांना नवे व्यासपीठ

**मेट्रो शहरात जाण्याची गरज नाही; स्थानिक स्तरावरच रोजगारनिर्मितीला चालना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील आयटी क्षेत्राला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण टप्पा गाठत ' इन्फोटेक'च्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या नवीन शाखेमुळे स्थानिक तरुणांना आयटी क्षेत्रात काम करण्यासाठी मेट्रो सिटीकडे धाव घेण्याची गरज राहणार नसून, शहरातच रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

या उद्घाटनप्रसंगी टॅली सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे सेल्स मॅनेजर बिपिन माहेश्वरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''उद्योजकांसाठी टॅली हे केवळ अकाउंटिंग सॉफ्टवेअर नसून ते एक संपूर्ण बिझनेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर आहे. या माध्यमातून जीएसटी, बँकिंग आणि व्यवसाय व्यवस्थापनाशी संबंधित सर्व सुविधा एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होतात.'' त्यांनी पुढे सांगितले की, ''अहिल्यानगरमध्ये सुमारे ५० हजार उद्योजक जीएसटी भरत आहेत. त्यांच्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी जलद आणि अचूक सेवा देण्याचे काम इन्फोटेक करणार आहे. पुण्यातील १३ वर्षांच्या यशस्वी अनुभवाच्या जोरावर देशभरातील ३००० हून अधिक उद्योजक आणि बँकांसोबत काम केले असून आता नगरमध्येही त्याचा लाभ मिळणार आहे.




अहिल्यानगर शहरात झालेल्या या शाखेच्या उद्घाटन सोहळ्यास कंपनीचे संचालक सागर नागुल, अक्षय कावळे, मॅनेजर अमित पाटील, बिझनेस कन्सल्टंट वीरेंद्र इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कंपनीचे संचालक सागर नागुल म्हणाले की, ''तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवसायामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे आमचे ध्येय आहे. टॅली प्राईम, एंटरप्राइझ रिसोर्स प्लॅनिंग (), क्लाऊड डिप्लॉयमेंट आणि कस्टमाईज बिझनेस वर्कफ्लो ऑटोमेशन या क्षेत्रात आम्ही विशेष काम करतो. १३ वर्षांपूर्वी पुण्यात सुरू झालेल्या या कंपनीने अनेक उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत त्यांची प्रगती साधली आहे. आता अहिल्यानगर जिल्ह्यातील उद्योग, व्यापारी आणि उद्योजकांना सक्षम करण्यासाठी ही नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे. तसेच येथील हुशार युवकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जातील.

मॅनेजर अमित पाटील यांनी टॅली प्राईमच्या नव्या वैशिष्ट्यांबद्दल सविस्तर माहिती देताना सांगितले की, ''नवीन टॅली प्राईममध्ये कनेक्टेड सर्व्हिसेसची सुविधा उपलब्ध आहे. यामध्ये वापरकर्त्यांना थेट टॅलीमधूनच बँकिंग अनुभव घेता येतो. बँक बॅलन्स, स्टेटमेंट इम्पोर्ट करणे यामुळे कामाची अचूकता आणि वेग वाढतो. तसेच 'इनव्हॉइसिंग सिस्टम'मुळे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी इनव्हॉइस सहज पाठवता येतात, ज्यामुळे वेळेची बचत होते आणि व्यवसाय अधिक कार्यक्षम बनतो.

ते पुढे म्हणाले की, ''कनेक्टेड बँकिंगमध्ये , आणि कोटक या बँकांच्या सेवा थेट उपलब्ध आहेत. यामुळे व्यापाऱ्यांना स्वतंत्र बँकिंग प्रक्रियेत वेळ घालवण्याची गरज भासत नाही. संपूर्ण प्रक्रिया एका सॉफ्टवेअरमध्ये पार पडते, ज्यामुळे व्यवसाय अधिक वेगवान आणि अचूक होतो.

कार्यक्रमाच्या शेवटी अक्षय कावळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या नवीन शाखेमुळे अहिल्यानगरमधील उद्योग, व्यापारी आणि विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून शहराच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार आहे.

# माहिनूर शेख एसएससी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील विद्यार्थिनी माहिनूर आदिल शेख हिनेएसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत८८ टक्के गुण मिळवून विशेषप्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. तिच्या या यशामुळे शैक्षणिकक्षेत्रासह परिसरात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरातूनतिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.माहिनूरशेख हिने आपले प्राथमिकव माध्यमिक शिक्षण शहरातील नामांकित पी ए इनामदारइंग्लिश स्कूल येथेपूर्ण केले.



सद्यस्थितीत ही शाळा येसफौंडेशन केरळ यांच्या व्यवस्थापनाखाली कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीविशेष प्रयत्न केले जात आहेत. शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि स्वतःची मेहनतयांच्या जोरावर माहिनूरने हे यश मिळविलेअसल्याची भावना व्यक्त केली. अभ्यासातसातत्य, वेळेचे योग्य नियोजन आणि आत्मविश्वास यांच्याबळावर माहिनूरने बोर्ड परीक्षेत ८८ टक्के गुण मिळवत कुटुंबाचे तसेच शाळेचे नावउज्ज्वल केले आहे.

तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळतअसून परिसरातील अनेकांनी तिच्या मेहनतीचे कौतुक केले आहे.माहिनूरही ज्येष्ठ पत्रकार रियाज शेख यांची नातअसून आदिल शेख यांचीकन्या आहे. सामाजिक क्षेत्रातकार्यरत असलेल्या कुटुंबातील संस्कार आणि शिक्षणाला दिलेलेमहत्त्व यामुळेच माहिनूरला यशाचा हा टप्पा गाठताआला, अशी भावना नातेवाईकव मित्रपरिवारातून व्यक्त करण्यात येत आहे.

निकालज ाहीर झाल्यानंतर माहिनूर शेख हिच्यावर अभिनंदनाचावर्षाव सुरू झाला असून अहिल्यानगर शहरातील विविध मान्यवर, शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच मित्रपरिवाराने तिचे अभिनंदन केले आहे. तिच्यापुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा व्यक्त करत उज्ज्वल भविष्यासाठीआशीर्वाद दिले आहेत.

# बाणेश्वर विदयालयाच्या गुणवंत विद्यार्थाचे आ.अक्षय कर्डीले हस्ते सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय बु-हाणनगर विदयालयाचा एसएससी परीक्षेचा निकाल ९८.७४ टक्के लागला असुन एचएससी परीक्षेचा निकाल कला शाखा८८.७५, वाणिज्य शाखा८५.३३,विज्ञान शाखा९८.०७लागला असुन सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते आज सत्कार करण्यात आला.यावेळी सुभाष कराळे,बोर्डे साहेब, संस्थेचे सर्व संचालक मंडळ,ग्रामस्थ, विदयालयाचे प्राचार्य श्री हापसे के.एम.,सीडी शिकारे,आर वाय झावरे ,ग्रामस्थ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते

एसएससी परीक्षा मार्च २०२६ प्रथम कु.कार्तिकी तुकाराम कर्डिले व कु. श्रेया भाऊसाहेब वारुळे,द्वितिय कु.गायत्री दत्तात्रय कर्डिले,तृतिय कु.श्रध्दा विजय कलमदाणे, १२ वी(एचएससी)परीक्षा मार्च २०२६ कला शाखा कु.वैष्णवी विनोद बु-हाडे, प्रथम कु.भाग्यश्री मोहन पटेकर,द्वितिय, कु.श्रध्दा अमोल गवारे तृतिय, वाणिज्य शाखा कु.दिपाली विष्णु डोके,वाणिज्य प्रथम,कु.प्रतिक्षा राजेंद्र वारुळे वाणिज्य द्वितिय,कु. अनुजा लक्ष्मण लष्करें वाणिज्य तृतिय, विज्ञान शाखा ,कु.तनुश्री प्रकाश शिदोरे विज्ञानप्रथम, कु.तन्वी ज्ञानेश्वर तापकिरे विज्ञानद्वितिय,कु.तनिष्क सोमनाथ बनसोडे विज्ञान तृतिय, कु.परमेश्वरी संग्राम जगताप विज्ञान चतुर्थ

संस्थेचे अध्यक्ष आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले संस्थेचे सर्व संचालक मंडळ, ग्रामस्थ, विदयालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती जाहिरातीस मुदतवाढ द्या

**कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यतेअभावी भरती प्रक्रिया रखडली**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संच मान्यता कनिष्ठ महाविद्यालयांची उपलब्धता अद्यापही प्रलंबित असल्याने पवित्र पोर्टलमार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीच्या जाहिरातीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी वर्षाताई गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन त्यांच्या मार्फत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच शिक्षण आयुक्तांकडे पाठविण्यात आले आहे.

यावेळी शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष बबन शिंदे, सुनिल दानवे, संजय पालवे, अशोक पवार, रावसाहेब गाणखेर, सुरेश सरोटे, मच्छिंद्र ढाकणे, एम. एस. साखरे, ए. पी. क्षीरसागर, जी. एम. शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील संच मान्यतेतील रिक्त पदांच्या आधारे पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. मात्र, माध्यमिक विभागाशी संलग्न असलेल्या अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता अद्याप प्रलंबित असल्यामुळे संबंधित शाळांमध्ये रोस्टर तपासणी आणि रिक्त शिक्षक पदांची



जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी भरती प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

शिक्षक परिषदेने शासनाकडे मागणी करताना स्पष्ट केले की, कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता उपलब्ध झाल्यानंतरच भरती जाहिरातीची अंतिम मुदत निश्चित करण्यात यावी. तसेच राज्यातील बहुसंख्य शिक्षकांची जन्मतारीख १ जून असल्याने दरवर्षी ३० जून रोजी मोठ्या प्रमाणावर शिक्षक सेवानिवृत्त होतात. त्यामुळे अनेक विद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो.

याच पार्श्वभूमीवर शिक्षक परिषदेने शासनाला विनंती केली आहे की, पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेसाठी ३१ मे २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या जागांचा विचार करण्याऐवजी ३० जून २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या पदांचा आधार घ्यावा. त्यानुसार भरती जाहिरातीस मुदतवाढ देऊन सर्व रिक्त पदांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

''कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यता प्रलंबित असल्यामुळे अनेक ठिकाणी शिक्षक भरतीची प्रक्रिया रखडली आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन भरती जाहिरातीस मुदतवाढ द्यावी. तसेच ३० जूनपर्यंत रिक्त होणाऱ्या सर्व शिक्षक पदांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल आणि शाळांमधील शिक्षकांची कमतरता भरून निघेल.'' -बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

## शिक्षक आमदार किशोर दराडे यांची अहिल्यानगरमध्ये शुक्रवारी प्रलंबित प्रश्नांवर बैठक



अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक शुक्रवार दि. १५ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली.या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सॲपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सॲप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान

अहिल्यानगर - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम तुळापूर येथे राबविण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी उपस्थित राहून कार्यकर्त्यांनी प्रथम महाराजांना अभिवादन केले. त्यानंतर समाधी परिसर, परिसरातील सार्वजनिक जागा तसेच परिसरातील स्वच्छतेचे काम हाती घेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे इतिहासाचे जतन, स्वच्छतेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी पटवून देण्यात आली.यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, अशोक भालके, संदीप डोंगरे, ऋषीकेश चव्हाण यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित युवकांनी 'स्वच्छता हीच खरी सेवा' हा संदेश देत परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच रांजणगाव (जि. पुणे) येथील प्रसिद्ध गणपती मंदिरात दर्शन घेण्यात आले. मंदिर परिसरातही स्वच्छतेबाबत जनजागृती करत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याची शपथ देण्यात आली. संस्थेच्या वतीने अशा प्रकारचे सामाजिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले जात असून भविष्यातही समाजप्रबोधनासाठी विविध उपक्रम घेण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.पै. नाना डोंगरे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन करून थांबणे पुरेसे नाही, तर त्यांच्या विचारातून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची प्रेरणा घेणे आवश्यक आहे. स्वच्छता ही केवळ सरकारी मोहीम नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून इतिहासाबद्दलचा आदर आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करत आहोत. सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, ऐतिहासिक स्थळे आणि गाव परिसर स्वच्छ ठेवणे ही खरी देशसेवा आहे. युवकांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या पलीकडे जाऊन समाजकार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत "टेक फेस्ट २०२६" उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी येथील माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजित टेक फेस्ट २०२६ हा दोन दिवसीय तांत्रिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना () यांच्या वतीने आयोजित या महोत्सवाची थीम "अवेकिंग द इंटेलिजन्स विदिन द मशीन " अशी होती.

या महोत्सवात विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कृत्रिम बुद्धिमत्ता () व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची उत्तम संधी मिळाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व्ही. आर.डी.इ.चे सेवानिवृत्त शास्त्रज्ञ श्री.आर.पी.वायकर हे उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.असे मार्गदर्शन करताना आपल्या भाषणातून सर्व विद्यार्थ्यांचे मन भरून कौतुक केले.

पहिल्या दिवशी बौद्धिक व तांत्रिक कौशल्यांची कसोटी पाहणाऱ्या स्पर्धा घेण्यात आल्या.या मध्ये ज्ञानवर्धक प्रश्नमंजुषा स्पर्धा, रिवर्स कोडिंग पोस्टर सादरीकरण, वक्तृत्व व विचारमंथन स्पर्धा, जपानी भाषा व संस्कृतीवरील प्रश्नमंजुषा, जपानी प्रोजेक्ट.

दुसऱ्या दिवशी सर्जनशीलता व मनोरंजनाला प्राधान्य देण्यात आले.यामध्ये प्रोग्रामिंग स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे सादरीकरण,पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा, गेम झोन यांसारख्या गेम्स घेण्यात आल्या.

या महोत्सवात विद्यार्थ्यांनी कोडिंग, सादरीकरण, वक्तृत्व व सर्जनशीलतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. आकर्षक बक्षिसांमुळे स्पर्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ . दीपक विधाते , शिक्षक समन्वयक डॉ.प्रतिभा गायके, प्रा.प्राजक्ता डोलारे, प्रा.गणेश डहाणे, प्रा.आरती बावणे, प्रा. अविनाश पुंड, प्रा.पूजा वैकर तसेच विद्यार्थी समन्वयक सुरज हुंडाडे, ओंकार जोशी, पूजा केवट, श्रद्धा तांगडे, सोहम शिंदे, पूजा कोतकर, गायत्री लामखडे, ऋषिकेश कड, अथर्व हारदे, वरद कुलकर्णी तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले. फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले. टेक फेस्ट २०२६ हा महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला असून, तांत्रिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

# प्रोफेसर कॉलनीला धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज चौक नामकरण करावे

### अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनची महापालिकेकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानाचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उदात्त भावनेतून अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक 'प्रोफेसर कॉलनी' परिसराचे अधिकृत नामकरण धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज चौक असे करण्यात यावे, अशी भावनिक व आग्रही मागणी अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील विशेष निवेदन महापालिका प्रशासनाला देण्यात आले.

प्रोफेसर कॉलनी परिसरात उभारण्यात आलेला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा भव्य पुतळा हा केवळ स्मारक नसून, तो स्वाभिमान, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रेरणास्थान असल्याची भावना फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य, धर्म आणि संस्कृती रक्षणासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान समाजाच्या स्मरणात कायम राहावे, यासाठी या चौकाला त्यांचे नाव देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, प्रोफेसर कॉलनी हे नाव या परिसराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अस्मितेला न्याय देत नाही. ज्या ठिकाणी धर्मवीरांचा भव्य पुतळा दिमाखात उभा आहे, त्या परिसराला त्यांच्या नावाची ओळख मिळणे हा त्यांच्या इतिहासाचा आणि शौर्याचा खरा सन्मान ठरेल.

या मागणीला स्थानिक नागरिक, शिव-शंभू भक्त आणि तरुण वर्गातून मोठा प्रतिसाद मिळत असून, परिसरात व्यापक जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाने लोकभावना लक्षात घेऊन कोणतीही दिरंगाई न करता नामकरणास मंजुरी द्यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही फाउंडेशनच्या वतीने देण्यात आला.

यासंदर्भातील निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांना देण्यात आले. यावेळी ट्रस्ट कमिटी सदस्य संदीप नवसुपे मनोज सोनवणे जिल्हाध्यक्ष अशोक गाडे, निलेश सुंबे, दरेकर काका, शशिकांत भांबरे, संजयजी शिंदे, भाग्येश सव्वाशे, सिद्धांत पानसरे, बालाजी काळे, भरत सुंबे, अभय शेडगे, श्रीपाद दगडे , सौरव गांगर्डे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक गाडे म्हणाले,धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य, त्याग आणि शौर्य हे संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या नावाने या चौकाची ओळख निर्माण होणे म्हणजे इतिहासाला अभिमानाने वंदन करण्यासारखे आहे. ही केवळ नामांतराची मागणी नसून, जनतेच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा आवाज आहे.

# वन्यजीवांच्या संरक्षणासाठी आयुष्यभर काम करणार - भारती शेवते

### भारती शेवते यांची 'मानद वन्यजीव रक्षक' पदी नियुक्ती । वनविभाग कार्यालयात सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर**– जंगलातील मूक प्राण्यांच्या संरक्षणासाठी अनेक वर्षे जीवाची पर्वा न करता संघर्ष करणाऱ्या भारती अनिल शेवते यांना महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'मानद वन्यजीव रक्षक'म्हणून अधिकृत नियुक्ती दिली आहे. विशेष म्हणजे, या जबाबदारीवर नियुक्त होणाऱ्या त्या जिल्ह्यातील पहिल्या महिला ठरल्या आहे.

वनविभाग कार्यालयात उपवनसंरक्षक सौ. अश्विनी दिघे यांच्या हस्ते भारती शेवते यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी तेलोरे, शिरसाठ, वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी, तसेच निसर्ग भ्रमंती ग्रुपचे विद्यासागर पेटकर आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जखमी वन्यजीवांचे रेस्क्यू, शिकारींवर नजर, वन्यजीव गुन्ह्यांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे या क्षेत्रात भारती शेवते गेल्या अनेक वर्षांपासून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या धाडसी आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

भारतातील वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ ( १९७२) अंतर्गत वन्यजीवांची शिकार, तस्करी, अवैध व्यापार आणि अधिवास नष्ट करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या कायद्यांतर्गत दोषींवर दंड आणि कारावासाची तरतूद असून, वनविभागासोबत समन्वय साधून मानद वन्यजीव रक्षकांना देखील संरक्षण आणि जनजागृतीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावता येते. त्यामुळे भारती शेवते यांच्या नियुक्तीमुळे वन्यजीव संरक्षण मोहिमेला अधिक बळ मिळणार असल्याचे उपस्थितांनी स्पष्ट केले. भारती शेवते यांनी हा सन्मान माझा नसून जंगलातील त्या मूक प्राण्यांचा आहे, ज्यांच्या संरक्षणासाठी मी आयुष्यभर काम करत राहणार असल्याचे त्या म्हणाल्या.

# हिरडपुरी वाळू टेंडरचे गौडबंगाल नेमके काय?

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** तालुक्यातील हिरडपुरी येथील वाळू टेंडरभोवती संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, नेमके गौडबंगाल काय आहे, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. टेंडर एका बाहेरील व्यक्तीच्या नावावर असल्याची चर्चा असताना, प्रत्यक्षात वाळू उपसा मात्र स्थानिक वाळू माफियांची टोली करत असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने निश्चित करून दिलेल्या गट क्रमांकातील वाळू उपसा न करता इतर ठिकाणांवरूनही बेसुमार वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप होत आहे. दिवस-रात्र पोकलेन मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळू काढली जात असून, पर्यावरणासह महसुलालाही मोठा फटका बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. इतके सर्व प्रकार सुरू असतानाही महसूल विभाग व पोलिस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. "वाळू माफियांना अभय कोणाचे?" असा सवाल उपस्थित केला जात असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, पैठण तालुक्यात यापूर्वी इतके भ्रष्ट आणि निष्क्रिय प्रशासन कधीच पाहायला मिळाले नसल्याची तीव्र प्रतिक्रिया जनसामान्यांमधून उमटत आहे. हिरडपुरी परिसरातील अवैध वाळू उपशाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आवडे उंचेगावच्या नाईक विद्यालयाचा निकाल उज्वल

### ५८ विद्यार्थी उत्तीर्ण; वैष्णवी गावडे प्रथम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण**– तालुक्यातील आव्हडे उंचेगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयाची गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम राहिल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

विद्यालयातील एकूण ६२ विद्यार्थ्यांपैकी ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये १९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, २९ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर १० विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळविले.



विद्यालयातून वैष्णवी गावडे हिने ७७.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पल्लवी गोलेकर हिने ७५.२० टक्के गुणांसह द्वितीय तर राजश्री मसके हिने ७४.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. भारत झारगड, सचिव सुखुबाई झारगड, संचालक सुधीर कानडे, बाळासाहेब झारगड, मुख्याध्यापक विजय लोखंडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# रविवारी शहरात जायंटसची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिंपोझीयमचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जागतिक दर्जावर सामाजिक कार्य करणाऱ्या जायंटस वेलफेअर फाउंडेशन फेडरेशन दोन ब ची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिम्पोझियमचे अहिल्यानगर शहरात रविवार दि. १७ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल यश पॅलेस येथे होणाऱ्या या बैठकीसाठी फेडरेशन कौन्सिलच्या सर्व पदाधिकारी व सहेली सिंपोझीयमसाठी राज्यातील सर्व महिला प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची माहिती जायंट्सचे स्पेशल कमिटी मेंबर संजय गुगळे यांनी दिली.

जायंटस वेल्फेअर फाउंडेशन ही एक समाजसेवी संस्था असून, या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. नाना चुडासामा यांनी १९७३ मध्ये मुंबई येथे या संस्थेची भारतीय संस्था म्हणून स्थापना केली. त्यानंतर परदेशात या संस्थेने आपल्या शाखा सुरू केल्या. भारतात ६०० शाखेद्वारे काम सुरू असून २५ हजाराचे वर सदस्य यामध्ये सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक ,वैद्यकीय अशा क्षेत्रात काम करीत आहे. जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने गेली ४० वर्ष संस्थापक संजय गुगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरामध्ये विविध अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. या समाजोपयोगी उपक्रमाची दखल घेऊन ग्रुपला राज्य व आंतरराष्ट्रीयस्तरावर अनेकदा गौरविण्यात आले आहे.

फेडरेशन २ ब मधील पदाधिकाऱ्यांची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिंपोझियम मीटिंग चे आयोजन जायंटस ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आलेले आहे. याप्रसंगी निसर्गोपचार तज्ञ हेमा सेलोत तज्ञ आहार आणि योगावर मार्गदर्शन करणार आहेत. तर प्रा. आशा कव्हाणे महिला सक्षमीकरणावर संवाद साधणार आहेत. ही मीटिंग यशस्वी होण्यासाठी अहिल्यानगर ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत व प्रकल्प प्रमुख अनिल गांधी प्रयत्नशील आहेत.

# जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण समितीत राजेश परदेशी यांची नियुक्ती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर**– जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर येथे शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय डी. घोगरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. या नियुक्तीमुळे जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, सक्षम आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सुलभ करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या वतीने जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, प्रभावी आणि नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने संनियंत्रण व सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये विविध विभागातील अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला असून रुग्णालयातील सेवा-सुविधा, प्रशासन व्यवस्था आणि रुग्णांच्या समस्या यावर प्रभावीपणे लक्ष ठेवण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे.

समितीमधील सदस्य जिल्हा रुग्णालयातील औषध पुरवठा, स्वच्छता व्यवस्था, रुग्णांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा, वैद्यकीय यंत्रणेचे कामकाज तसेच नागरिकांच्या तक्रारी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. सर्वसामान्य रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, शासकीय योजनांचा लाभ योग्य पद्धतीने मिळावा आणि रुग्णालयातील व्यवस्थापन अधिक गतिमान व्हावे, यासाठी समिती सक्रियपणे कार्य करणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी राजेश सुरेशलाल परदेशी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी राज्य शासन तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानतो. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. राज्य सरकार नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध आहे. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांच्या अडचणी समजून घेऊन त्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील."

दरम्यान, राजेश परदेशी यांच्या या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालयातील सेवा अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिवसेनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिवसेनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने प्रोफेसर कॉलनीतील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी माजी जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, माजी शहरप्रमुख संभाजी कदम, गटनेते व नगरसेवक दत्ता कावरे, विक्रम राठोड, नगरसेवक संजय शेंडगे, नगरसेवक शाम नळकांडे,नगरसेवक नवनाथ कातोरे, नगरसेवक संदीप दातरंगे, नगरसेवक परेश लोखंडे, माजी महापौर व नगरसेविका सुरेखा कदम, सुरेश तिवारी,दिपक आडेप अभिजीत अष्टेकर, चेतन शिरसूल,प्रशांत कोकाटे,प्रताप गडाख,शाम सोनवणे, घनश्याम घोलप, स्वाती जाधव, शोभना चव्हाण, अरूण झेंडे,आबामहाराज गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

संभाजी कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली स्वराज्य व धर्मासाठी बलिदान देणारे महापुरूष छत्रपती संभाजी महाराज होते. जीवापेक्षाही धर्म प्रिय असणारे धर्मासाठी काहीपण या पध्दतीने असे अजय योध्दा १२० पैकी एक लढाईपैकी एक युध्द न हारलेले एकमेव छत्रपती संभाजी महाराज आहेत. संभाजी महाराजांची बुध्दीवान, कतृत्ववान व प्रशासक त्याचबरोबर एक धर्मनिष्ठ असे वेगवेगळे पैलू त्यांचे जीवनचरीत्र पाहीले की जाणवते छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज प्रति हा महाराष्ट कायम ऋणी राहील.

बाबुशेठ टायरवाले म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वंदन करतो संभाजी महाराजांचा इतिहास सर्वांना माहीत आहे तरूण पिढीने फक्त छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास हार अर्पण चालणार नाही धर्माच्या रक्षणासाठी प्रत्येक घरात संभाजी महाराज जन्माला आले पाहीजे महिलांनीपण मुलांना संभाजी महाराजाचे विचार सांगून संभाजी महाराज हे प्रत्येकाच्या हदयात निर्माण झाले पाहिजे.

# शंभुराजे प्रतिष्ठानच्या वतीने शिर्डीत शिवशंभूंचा जयघोष; सौ शालिनीताई विखे पा. यांच्या हस्ते पूजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी–** स्वराज्य धर्मरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आज शिर्डी शहरात शंभुराजे प्रतिष्ठान च्या वतीने अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित सोहळ्यात शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभूराजे च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

नगरपरिषद जवळील पाण्याच्या टाकीजवळ उभारण्यात आलेल्या भव्य व्यासपीठावर छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा विराजमान करण्यात आला होता. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील यांनी जयंती निमित्त छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करत शंभुराजे प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे



कौतुक केले.

शंभुराजे प्रतिष्ठानच्या वतीने सौ शालिनीताई यांचा पुष्पगुच्छ देत सन्मान करण्यात आला शिर्डी नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांच्या हस्ते या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विधीवत पूजन करण्यात आले. यावेळी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण करत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

यात जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील, उपनगराध्यक्ष: अभय भैय्या शेळके नगरसेवक दीपक गोंदकर, नंदू भाऊ गोंदकर,छोटे बापू कोते, अमित शेळके, किरण कोते, बापू ठाकरे, नितीन कोते, वसंत गोंदकर, सुधीर शिंदे, गणेश सोनवणे. यांसह शिर्डीतील प्रतिष्ठित ग्रामस्थ, शंभुराजे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शंभुराजे प्रतिष्ठानने केलेल्या या शिस्तबद्ध नियोजनाचे आणि उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# एडीएफए लीग फुटबॉल स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**संघनोंदणीसाठी आवाहन । विजेतेपदासाठी 'सुपर लीग' पद्धतीने रंगणार चुरस**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्हा फुटबॉल संघटना, अहिल्यानगर () यांच्या वतीने एडीएफए लीग २०२५-२६ फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या प्रतिष्ठेच्या स्पर्धेला दि. १४ मे पासून प्रारंभ होणार आहे. जिल्ह्यातील विविध क्लब संघांना स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संघांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, संघनोंदणीची अंतिम मुदत दि. १३ मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक संघांनी निर्धारित वेळेत आवश्यक कागदपत्रांसह आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी केले आहे.

जिल्ह्यातील फुटबॉल संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेच्या स्वरूपाबाबत एडीएफएने सविस्तर माहिती देताना सांगितले की, स्पर्धेमध्ये सहापेक्षा अधिक संघ सहभागी झाल्यास संघांची दोन गटात विभागणी केली जाईल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ 'सुपर लीग' फेरीसाठी पात्र ठरतील. त्यानंतर सुपर लीगमध्ये पात्र ठरलेले संघ एकमेकांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळतील. सुपर लीगमधील गुणांच्या आधारे अंतिम विजेता घोषित करण्यात येणार असल्याने स्पर्धेत मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

स्पर्धेसाठी प्रत्येक संघाला जास्तीत जास्त २० खेळाडूंची नोंदणी करता येणार आहे. संघनोंदणी अर्ज हा एडीएफएकडून देण्यात आलेल्या अधिकृत नमुन्यात भरावा लागणार असून, त्यावर संघमालक, प्रशिक्षक, व्यवस्थापक आणि कर्णधार यांच्या स्वाक्षऱ्या तसेच संबंधित क्लबचा अधिकृत शिक्का असणे बंधनकारक करण्यात आले आहे. संपूर्ण भरलेले अर्ज दि. १३ मे रोजी दुपारी १२ वाजण्यापूर्वी एडीएफए कार्यालयात जमा करणे आवश्यक राहणार आहे. मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# यस पी.ए. इनामदार स्कूलचा १० वी बोर्डाचा १०० टक्के निकाल


**९२ टक्के घेऊन तहुरा शेख प्रथम; गुणवत्तेत मुलींची बाजी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मुकुंदनगर येथील इकरा एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित यस पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूलचा इयत्ता दहावी (एसएससी) बोर्डाचा निकाल १०० टक्के लागला आहे. इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा शाळेने कायम राखली आहे.

यावर्षीच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले. शाळेच्या गुणवत्ता यादीत तहुरा बशीर शेख ९२.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. माजीया साजिद कुरेशी हिने ९१.८० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक मिळवला, तर माहिन मोसीन पठाण हिने ९०.६० टक्के गुण प्राप्त करत तृतीय क्रमांकावर स्थान मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल



संस्थेचे चेअरमन अब्दुल रहिम खोकर, व्हाईस चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी आणि खजिनदार डॉ. खालिद शेख, प्राचार्य युनूस सलीम, डारेक्टर शब्बीर मोहंमद सी. तसेच उपप्राचार्या फरहाना शेख यांनी गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. तर विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेत वर्षभर मिळालेले शैक्षणिक मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, अभ्यासातील सातत्य आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

# चेक बाऊन्स प्रकरणी कर्जदारास तीन महिन्यांची शिक्षा

**पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या दाव्यास न्यायालयाचा दुजोरा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारणावर घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता दिलेला धनादेश अनादरीत झाल्याप्रकरणी अहमदनगर येथील न्यायालयाने कर्जदार कैलास मारुती भोसले यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच ९ लाख २७ हजार ४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कैलास मारुती भोसले यांनी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारण कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर अनादरीत झाला. त्यानंतरही आरोपीने कर्जाची रक्कम मुदतीत भरली नसल्याने पतसंस्थेने अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत एससीसी केस क्रमांक ६१२६/२०२४ दाखल केली होती.

सदर प्रकरणाची गुणदोषांवर सुनावणी झाल्यानंतर माननीय न्यायाधीश जी. जी. सोनी यांनी आरोपी कैलास भोसले यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी संस्थेस ९,२७,४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नुकसानभरपाईची रक्कम न भरल्यास आरोपीस अतिरिक्त सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने ॲड. युवराज पाटील, ॲड. गणेश दरेकर यांनी कामकाज पाहिले.

# परिचारिकांची रुग्णसेवा मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण - डॉ. उद्धव शिंदे




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रुग्णांची सेवा करताना परिचारिका केवळ वैद्यकीय जबाबदारी पार पाडत नाहीत, तर त्या रुग्णांना मानसिक आधार देत त्यांच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे काळजी घेतात. परिचारिकांची निस्वार्थ सेवा ही समाजासाठी प्रेरणादायी असून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

जागतिक परिचारिका दिनानिमित्त अहिल्यानगर, भिंगार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी सामान्य अस्पताल मधील परिचारिकांचा स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी शुभेच्छा दिल्या, यावेळी हॉस्पिटलच्या प्रशासक डॉ. गीतांजली पवार, डॉ. सद्दाम कच्ची, डॉ. अभिजीत आल्हाट, डॉ. धनंजय गुंड तसेच हॉस्पिटलमधील नर्सेस व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य सेवेमध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून रुग्णसेवेत त्यांचे योगदान मोलाचे आहे. समाजाने त्यांच्या कार्याचा आदर करून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

–छावणी परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी : पल्लवी विजयवंशी

कार्यक्रमात परिचारिकांना पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांनी परिचारिकांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

**मुकुंदनगर भागातीलरस्त्याच्या दुरुस्तीची मागणी**

# आठ दिवसातकाम सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा: नगरसेवक शम्स खान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या मुकुंदनगर व गोविंदपुरा भागातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी नगरसेवक शम्स खान यांनी महानगरपालिका आयुक्ताकडे निवेदनाद्वारे केली आहे. काही वर्षापूर्वी तयार करण्यात आलेले मुख्य रस्ते आज अत्यंत खराब अवस्थेत असून ठीक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे. शहरातील इतर भागामध्ये रस्त्यांची कामे सुरू असताना मुकुंदनगर भागाकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप निवेदनाद्वारेत करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करून ही केवळ तात्पुरती डागडूजी केली जाते मात्र काही दिवसापासून रस्त्याची अवस्था पुन्हा पूर्ववत होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.



विशेषतः गोविंदपुरा परिसरातील सीआयव्ही कॉलनी समोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहन चालकांना जीवमठीत धरून प्रवास करावा लागतो. खड्ड्यामुळे अपघाताची शक्यता वाढली असून नागरिकांच्या सुरक्षितेचे प्रश्न निर्माण झाले आहे. त्यामुळे मुकुंदनगर व गोविंदपुरा भागातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्याची कामे पुढील आठ दिवसात सुरू करावीत अन्यथा स्थानिक नागरिकासह महापालिका कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा नगरसेवक शम्स खान यांनी केला आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे १५ मे रोजी 'एमएसएमई क्रेडिट आऊटरीच' व उद्यमिता मेळावा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशातील पहिली स्वदेशी तसेच राष्ट्रीयीकृत सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर यांच्या वतीने 'एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम' व उद्यमिता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १५ मे २०२६ रोजी सुपा एमआयडीसी आणि नागापूर एमआयडीसी येथे संपन्न होणार आहे.



उद्योग क्षेत्रातील जनजागृती वाढविणे, उद्योजकांना बँकिंग योजनांची माहिती उपलब्ध करून देणे तसेच विविध कर्ज सुविधांबाबत मार्गदर्शन करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे बँकेच्या वतीने सांगण्यात आले.

या कार्यक्रमास सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्राचे क्षेत्रीय प्रमुख. नरेश कुमार दुबे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक . आशिष नवले यांच्यासह बँकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रशासनातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नागापूर एमआयडीसी येथील कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता प्लॉट क्रमांक -५२, हॉल, नागापूर, अहिल्यानगर येथे होणार असून सुपा एमआयडीसी येथील कार्यक्रम हॉटेल कुणाल पॅलेस, नगरपुणे महामार्ग, सुपा, ता. पारनेर येथे पार पडणार आहे.

मेळाव्यात उद्योजकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांविषयी माहिती देण्यात येणार आहे. यामध्ये 'सेंट ', 'सेंट हॉटेल', 'सेंट संजीवनी (डॉक्टरांसाठी)', 'सेंट शॉप', 'सेंट बिझनेस' आणि 'सेंट इंजिनिअरिंग' यांसारख्या योजनांचा समावेश आहे. तसेच नवीन ऋण योजना, उद्योग कर्ज सुविधा, उद्यमिता जनजागृती आणि बँकिंग सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# धर्मवीरांच्या जाज्वल्य इतिहासातून तरुणांनी प्रेरणा घ्यावी

**खा. नीलेश लंके यांचे प्रतिपादन । पारनेरमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. खासदार नीलेश लंके यांच्या कार्यालयासमोर छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित शिवभक्तांनी जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभूराजेच्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. कार्यक्रमात बोलताना खासदार नीलेश लंके यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा गौरव करत त्यांच्या चरित्रातून तरुणांनी प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. छत्रपती संभाजी महाराज हे केवळ सिंहासनाचे वारस नव्हते, तर स्वराज्याच्या अस्मितेसाठी प्राणार्पण करणारे तेजस्वी सूर्य होते. औरंगजेबासारख्या बलाढ्य सत्तेसमोर त्यांनी कधीही मस्तक झुकवले नाही. संकटांशी संघर्ष करत स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते, असे खा. लंके म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, संभाजीराजे हे



लहानपणापासूनच विद्वान, धैर्यवान आणि पराक्रमी होते. संस्कृत, फारसी, अरबीसह अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठा साम्राज्यावर मोठे संकट आले असताना संभाजीराजांनी न डगमगता तब्बल नऊ वर्षे मुघलांविरुद्ध संघर्ष केला. बुरहानपूरवरील मोहिम, विविध किल्ल्यांवरील विजय आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेला लढा हा इतिहासातील सुवर्ण अध्याय असल्याचे त्यांनी सांगितले. संभाजीराजे हे केवळ योद्धे नव्हते, तर साहित्यिक आणि धर्मरक्षकही होते, असे नमूद करत खा. लंके म्हणाले, 'बुधभूषण'सारखे संस्कृत काव्य त्यांनी लिहिले. धार्मिक सहिष्णुता जपत सर्व धर्मीयांना समान वागणूक दिली. मात्र औरंगजेबाच्या विश्वासघातकी कारस्थानामुळे त्यांना कैद करण्यात आले आणि अमानुष छळ करून हत्या करण्यात आली. तरीही त्यांच्या बलिदानाने मराठा साम्राज्याची ज्योत अधिक प्रखर झाली.

आजच्या तरुणांनी संभाजीराजांच्या शौर्य, त्याग आणि सत्यनिष्ठेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाज आणि राष्ट्रासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. मातृभाषा मराठीचा अभिमान जपत स्वराज्याचा विचार पुढे नेण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी खा. लंके यांचे ज्येष्ठ बंधू दीपक (आण्णा) लंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनशेठ भालेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप सालके, संचालक रा. या. औटी, मारुतराव रेपाळे, नगरपंचायत सदस्य, विविध गावांचे सरपंच-उपसरपंच, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी, निलेश लंके प्रतिष्ठान, आपला मावळा संघटनेचे कार्यकर्ते तसेच पारनेर शहरातील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## खोटे ठरवणारी माहिती जाहीर केली आहे ती देवाभाऊंना मान्य आहे का?

ठाकरे शिवसेनेचे आरोप आयुक्त डांगे यांनी फेटाळून लावल्या नंतर त्यावर पलटवार करताना किरण काळे म्हणाले, आयुक्त फक्त लिहून दिलेले स्क्रिप्ट वाचतात. मनपाच्या नियोजन शून्य, आत्मघातकी कारभाराचा शिवसेनेने भांडाफोड केल्यानंतर चुकीची माहिती देऊन सारवा सारव, नगरकरांची दिशाभूल करतात. दोन वर्षांपासून चालू असणारी रस्त्यांची काम का रखडली आहेत ? पगारासाठी मनपा कर्मचाऱ्यांना वारंवार आंदोलन का करावा लागतं ? साधं वीज बील का भरता येत नाही ? तिजोरीत खडखडाट का आहे ? स्वहिश्याची रक्कम कुठून आणणार आहे ? याची उत्तरं आधी द्यावीत, अस आव्हान काळे यांनी दिल आहे.

## नगर-कल्याण महामार्ग ठप्प होणार!

कामात मोठी साथ लाभते. या रस्ता रोको आंदोलनासाठी शेतकऱ्यांनी कांद्याच्या माळा घालून आणि ट्रॅक्टरसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क झाले असून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. जिल्हा प्रशासनाकडून चर्चेचे प्रयत्न झाले असले तरी मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. या आंदोलनामुळे कांदा उत्पादकांचा प्रश्न पुन्हा एकदा राज्याच्या केंद्रस्थानी आला आहे.

## एसआयआर योजनेचा तिसरा टप्पा महाराष्ट्रासह सोळा राज्यांत होणार सुरू

प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली आहे. ज्यात ५९ कोटी मतदारांचा समावेश होता. त्यामध्ये ६.३ लाख बीएलओ आणि ९.२ लाख बीएलएंचा समावेश होता.

महाराष्ट्रातील वेळापत्रक

एसआयआरसाठी पात्रतेची तारीख : १ ऑक्टोबर २०२६

एसआयआर तयारी, प्रशिक्षण आणि छपाई : २० जून ते २९ जून बीएलओ मार्फत घरभेटी : ३० जून ते २९ जुलै

मतदान केंद्रांचं सुसूत्रीकरण () : २९ जुलै

मसूदा मतदार यादीची छपाई : ५ ऑगस्ट

दावे आणि आक्षेप यासाठी मुदत :५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर

दावे आणि आक्षेपांचा निपटारा करणे : ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे : ७ ऑक्टोबर २०२६.